# हिमगिरी को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.
# HIMGIRI CO. OP. HSG. SOCIETY LTD.
Regd. No. NBOM / CIDCO / Hsg. (O.H.) / 178 / JTR / 95-96 Dt. 22-11-95

Office : B-6/0:3, Sector3, CIDCO Colony, Opp. Railway Station, Sanpada (E), Navi Mumbai-400 705.


Ref. No. जा-क्र. HCHS-25-26/024 Date : 29/05/25

## पुनर्विकसन प्रक्रियेमधील विशेष सर्वसाधारण सभेची सूचना व कार्यक्रम पत्रिका

सभेची तारीख : रविवार, दि. ०६ जुलै, २०२५

सभेचे ठिकाण : केमिस्ट भवन हॉल, सेक्टर-८, सानपाडा, नवी मुंबई.

सभेची वेळ : सकाळी ११:०० वाजता

प्रति,

सर्व संस्था सभासद,

महोदय / महोदया,

१. आपण संस्थेच्या इमारतींचे पुनर्विकसन प्रक्रिया राबवत असुन त्यासंबंधी दि. २७.०४.२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात आला आहे.

२. त्यानुसार समितीने शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार (७९ए) पुर्तता प्रक्रिया सुरु केली.

३. पुनर्विकसन प्रक्रियेकरीता प्राईम लिगल (लॉ फर्म) यांची विधीसल्लागार म्हणुन नियुक्ती केली.

४. सल्लागार व समिती यांनी प्रकल्प सल्लागार नेमणेकरीता आवश्यक - १. स्कोप ऑफ वर्क, २. निविदेचे स्वरुप, ३. निकष व ४. घ्यावयाची कागदपत्रे यांचा तपशील निश्चित केला आणि विधी सल्लागार यांनी दिलेल्या मसुदयात दि. ०८.०६.२०२५ रोजीच्या दै. लोकमत व दै. फ्रि प्रेस जरनल या मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन सक्षम व अनुभवी प्रकल्प सल्लागारांकडुन प्रस्तावाकरीता विनंती (request for proposal) मागविली.

५. त्यानुसार प्रकल्प सल्लागारांनी त्यांचे प्रस्ताव तांत्रिक व वाणिज्य (Technical and Commercial bids) स्वरुपात सादर केले.

६. सदर प्रस्तावांपैकी २-३ प्रस्ताव निवडुन ते विशेष सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे, त्या प्रकल्प सल्लागारांचे सादरीकरण आयोजित करणे व एका प्रकल्प सल्लागाराची निवड करणे आवश्यक आहे, याबाबतची सर्व कागदपत्रे संस्था कार्यालयात सभासदांचे माहितीकरीता उपलब्ध आहेत. तसेच निवडक पीएमसी (Shortlisted P.M.C.) ची नावे शुक्रवार, दि.२७.०६.२०२५ पर्यंत ठरवुन ती सोसायटीची वेबसाईट - www.himgirichs.com वर तसेच परिपत्रकान्वये सर्वांना कळविण्यात येतील. दरम्यानच्या काळात म्हणजेच विशेष सर्वसाधारण सभेपूर्वी निवडक प्रकल्प सल्लागार यांचे सादरीकरण (Presentation) सर्व सभासदांसमोर घेण्यात येईल.

HIMGIRI SOCT. LTD. SECTOR 3 SANPADA N. MUMBAI-400 705.

# हिमगिरी को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.

## HIMGIRI CO. OP. HSG. SOCIETY LTD.

Regd. No. NBOM / CIDCO / Hsg. (O.H.) / 178 / JTR / 95-96 Dt. 22-11-95

Office : B-6/0:3, Sector3, CIDCO Colony, Opp. Railway Station, Sanpada (E), Navi Mumbai-400 705.


Ref. No. जा. क्र. HCHS - 25-26/024 Date : 29/06/25

७. वरील घटनाक्रमाचे अनुषंगाने संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि.०६.०७.२०२५ रोजी केमिस्ट भवन हॉल, सेक्टर-८, सानपाडा, नवी मुंबई येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आलेली आहे.

८. सदर विशेष सर्वसाधारण सभेची कार्यक्रम पत्रिका -

सकाळी ११:०० वा. प्रास्तविक आणि सभेचा अध्यक्ष निवडणे.

दु. ११:१५ ते ११:४५ वा.पर्यंत २-३ कार्यकारी समिती सदस्यांचे मनोगत

**दु. १२:०० वा. प्रकल्प सल्लागार निवड (आवाजी मतदान अथवा गुप्त मतदानाने)**

सदर विशेष सर्वसाधारण सभेस फक्त अधिकृत सभासदांना उपस्थित राहाता येईल व मत प्रदर्शित करण्याचा तसेच मत देण्याचा हक्क असेल.

आपले विश्वासु,

HIMGIRI SOCT. LTD. SECTOR 3 SANPADA N.MUMBAI-400 705.

तारीख : २१.०६.२०२५

अध्यक्ष / सचिव,
हिमगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

**टीप :**

१. सर्व सभासदांनी स्वत:चे आधारकार्ड सोबत ठेवावे.
२. सभेची गणपूती (quorum) 2/3 राहील.
३. सभेस विधीसल्लागार उपस्थित राहतील.

प्रत सविनय सादर :

मा. उपनिबंधक सहकारी गृहनिर्माण संस्था सिडको, नवी मुंबई.